पुढारी

# डिजिटल ई-कन्टेन्ट देणे गरजेचे

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डिजिटल ई-कन्टेन्ट विकसित व्हावा, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग प्रयत्नशील आहे. त्यामुळे ज्ञानासाठी आसुसलेल्यांना ई-कन्टेन्ट देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्र व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट' विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. व्यासपीठावर प्रा. डॉ. नमिता खोत, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, डॉ.. एन. जे. बनसोडे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

दोनदिवसीय कार्यशाळेसाठी पुणे येथील शैक्षणिक बहु माध्यम संशोधन केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठकार व विनोद कल्गी यांनी ई-कन्टेन्ट विभागाचे टप्पे, निर्मिती, संहिता लेखन, ई-कन्टेन्टसाठी पॉवर पॉइंटचा उपयोग या विषयांवर मार्गदर्शन केले.

वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर उपस्थित होते. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका प्रा. डॉ. नमिता खोत यांनी मार्गदर्शन केले. अहवाल वाचन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपकुलसचिव डॉ.. एन. जे. बनसोडे यांनी करून दिला. भाग्यश्री गुरव यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक प्रा. डॉ. आर. यू. संकपाळ यांनी आभार मानले.

# ज्ञानासाठी आसुसलेल्यांना ई-कन्टेन्ट देणे गरजेचे

## - कुलसचिव डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यापीठ अनुदान आयोग डिजिटल ई-कन्टेन्ट विकसित व्हावा, यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे ज्ञानासाठी आसुसलेल्यांना ई-कन्टेन्ट देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले. ते दूरशिक्षण केंद्र व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट' विषयावर आयोजित कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, शैक्षणिक ई-कन्टेन्ट तयार करताना विश्लेषणात्मक संहिता तयार केली पाहिजे. ही संहिता परिणामकारक असली पाहिजे. संहितेचा आराखडा हा पॉवर पॉइन्ट सादरीकरणासाठी, ऑडिओ, व्हिडीओ किंवा मल्टीमीडियासाठी वेगवेगळ्या स्वरूपात तयार केला पाहिजे. ई-कन्टेन्ट विकसित करत असताना त्यामध्ये तज्ज्ञाकडून संपादन करून घेतले पाहिजे. त्यानंतरच अंमलबजावणी केली पाहिजे. अशा पद्धतीने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरिता प्रयत्न होणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : 'ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट' कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलताना कुलसचिव डॉ. व्ही. नांदवडेकर. सोबत डॉ. नमिता खोत, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे आदी.**

या दोनदिवसीय कार्यशाळेसाठी पुणे येथील शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्राचे तांत्रिक तज्ज्ञ श्रीकांत ठकार आणि विनोद कल्गी यांनी ई-कन्टेन्ट विभागाचे टप्पे, निर्मिती, संहितालेखन, ई-कन्टेन्टसाठी पॉवर पॉइंटचा उपयोग याविषयावर सविस्तर मार्गदर्शन केले असून संगीत अधिविभागातील स्टुडिओमध्ये याबाबतचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या कार्यशाळेसाठी वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव, वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर, विविध अधिविभागातील विभागप्रमुख, प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्रातील समन्वयक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक बॅ. खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक प्रा. डॉ. नमिता खोत यांनी, अहवाल वाचन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ.. एम. ए. अनुसे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन भाग्यश्री गुरव यांनी केले. आभार कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. आर. यु. संकपाळ यांनी मानले.

# नीलिशा देसाई यांच्या नावाने नवे पारितोषिक

## देसाई परिवाराकडून शिवाजी विद्यापीठास देणगी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
पर्यावरण अभ्यासक प्रा. डॉ. नीलिशा देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नवीन पारितोषिक निर्मितीसाठी देसाई कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठास तीन लाख रुपयाची देणगी दिली. या देणगीचा धनादेश प्रकाश देसाई यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे दिला.

साडे तीन वर्षापासून कर्करोगाशी सामना करणाऱ्या नीलिशा यांचे फेब्रुवारीमध्ये निधन झाले. त्या शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता आणि समावेशक केंद्राच्या सहायक संचालकपदी कार्यरत होत्या. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या स्मृती अखंडित जपण्यासाठी देसाई कुटुंबीयांनी विद्यापीठाला देणगी दिली आहे. या देणगीतून एम.एस्सी. भाग दोन पर्यावरणशास्त्र या अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीस 'प्रा. डॉ. नीलिशा प्रकाश देसाई या नावाने पारितोषिक देण्यात येणार आहे.

यावेळी अशोक देसाई, श्रीकांत देसाई, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी.डी. राऊत, पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड, निसर्गमित्रचे अनिल चौगुले, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

5 APR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी, पदव्युत्तर प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने

## देशातील सर्वच आकृषी विद्यापीठातील प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी केंद्र सरकारने विकसित केले एकच 'ॲप' : गुणवत्ता यादी विद्यापीठ जाहीर करणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शासन आदेशावरून देशभरातील सर्वच आकृषी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने होणार आहे. महाराष्ट्र शासन आयटी कंपनी मार्फत इंटिग्रेटेड युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट सिस्टम या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सर्वच विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. गेल्या आठवड्यात मुंबई येथे राज्यातील कुलसचिवांची बैठक झालेली आहे. या प्रवेश प्रक्रियेचा आराखडा तयार आहे. यासंदर्भात शिवाजी विद्यापीठ सर्वच अधिकार मंडळाची मान्यता घेवून जून २०१९ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू करणार आहे.

सरकारने २०१८-१९ ची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करावी, असे आदेश सर्वच आकृषी विद्यापीठांना देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०१७ मध्ये शिवाजी विद्यापीठाने तत्कालीन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीयप्रवेश प्रक्रियेचा आराखडा तयार करून समितीही नेमली होती. मात्र सरकारने सॉफ्टवेअर न दिल्याने ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन होऊ शकली नव्हती. पण २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील पदवी आणि पदव्युत्तरचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने व्हावेत यासाठी सरकारने सॉफ्टवेअर तयार केले आहे. यासंदर्भात आयटी कंपनी मार्फत इंटिग्रेटेड युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट सिस्टम सॉफ्टवेअरही तयार केले आहे मुंबईत झालेल्या कुलसचिवांच्या बैठकीत कशा पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करायची यासंदर्भात सूचना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सरकारने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विद्यापीठातील ४८ अधिविभाग व विद्यापीठ परिक्षेत्रातील २९० महाविद्यालयांचे प्रवेश घेणे अपरिहार्य आहे.

- २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून तीन राऊंडमध्ये प्रवेश
- विद्यापीठाच्या संकेत स्थळावर माहितीपत्रिका प्रसिद्ध होणार



अभियांत्रिकी प्रथम वर्षाचे प्रवेश अर्ज एकाच छताखाली भरले जातात. त्याप्रमाणे, पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाचे प्रवेश एकाच छताखाली मिळणार आहेत. विद्यार्थी इतर कॉलेजवरील प्रवेशासाठी पर्याय देऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रमही कमी होणार आहेत. अनुदानित महाविद्यालयांमध्ये १०० टक्के प्रवेश मेरीटवर दिले जाणार आहेत. तर विनाअनुदानित तुकडी आणि अभ्यासक्रमांच्या ८० टक्के जागा केंद्रीय पद्धतीने भरल्या जाणार असून २० टक्के जागा व्यवस्थापन कोट्यातून भरल्या जाणार आहेत. विद्यापीठ अंतर्गत तिन्ही जिल्ह्यातील २९० महाविद्यालयांची गुणवत्ता यादी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील कोणतेही महाविद्यालय स्वतंत्र प्रवेश यादी प्रसिद्ध करणार नाही. शासन नियमानुसार या प्रवेश प्रक्रिये अंतर्गत तीन फेऱ्यांमध्ये प्रवेश दिले जातील. तर सीमाभागातील विद्यार्थ्यांना २ टक्के राखीव जागा ठेवल्या जाणार आहेत. या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत आवडता विषय कोणत्या महाविद्यालयात आहे, याची माहिती ऑनलाईन पहावयास मिळणार आहे. या यादीनुसार पर्यायी अर्ज भरण्याची परवानगी विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र प्रवेश घेण्याची गरज नाही. विनाअनुदानित महाविद्यालय, विषय किंवा अभ्यासक्रमांना व्यवस्थापन कोट्यातून आवश्यकतेनुसार जागा वाढवून देण्याची शक्यता आहे. तर अनुदानित महाविद्यालयाला ४० टक्के जागा वाढवून दिल्या जाणार आहेत.

पूर्वी एखाद्या महाविद्यालयामध्ये गुणवत्ता यादीनुसार प्रवेश मिळाला नसेल तर एजंट व संस्थाचालकांकडून विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात होती. मात्र आता त्यांना चाप बसणार आहे. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेशाची यादी कमिटीस सादर केली जाणार आहे. त्यानंतर ऑनलाईन प्रवेश अर्जांची संगणकीय छाननी होऊन अंतिम प्रवेश यादी जाहीर केली जाईल. या यादीनुसार विद्यार्थ्यांनी दिलेला पसंती क्रमांक, आरक्षण व गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना योग्य त्या कॉलेजमध्ये प्रवेश दिला जाईल. विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रक्रियेनुसार प्रवेश मिळालेल्या कॉलेजमध्येच प्रवेश घेणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांना त्यांच्या क्षमतेनुसार विद्यार्थी संख्या मिळणार आहे.

### केंद्रीय प्रवेशामुळे विद्यार्थ्यांना न्याय मिळेल

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया एकाच छताखाली झाली झाली तर विद्यार्थ्यांना न्याय मिळेल. या प्रवेश प्रक्रियेत प्रत्येक कॉलेजवर जाऊन अर्ज भरण्याची गरज नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचतील, आणि गुणवत्तेनुसार प्रवेश असल्याने विद्यार्थ्यांना न्याय मिळेल. हा विषय अधिकार मंडळासमोर मांडून येत्या काही दिवसात मान्यता घेतली जाणार आहे. त्यानंतर २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाईन होतील.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर (शिवाजी विद्यापीठ)

लोकमत

विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# तापमान वाढत आहे

'उष्णतेच्या लाटेने महाराष्ट्र तापला; चंद्रपूर ४३.४' आणि 'यंदाचा उन्हाळा असणार कडक' या बातम्या या वर्षीही आल्या. या बातम्या आल्या नाहीत असे वर्ष मला तरी आठवत नाही. दरवर्षी या बातम्या येतच आहेत. आपण त्या वाचतच आहोत. यावर्षी तर एप्रिल सुरु होतानाच साडेत्रेचाळीस सेल्सिअस अंश तापमानाकडे आपली वाटचाल सुरु झाली आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेशात तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सलग तीन दिवस ही उष्णतेची लाट कायम राहील असा अंदाज आहे. एप्रिल ते जून या कालावधीत सरासरीपेक्षा ०.५ अंश तापमान जास्त राहील, असाही अंदाज आहे; तर राजस्थानात ते सरासरीपेक्षा एक अंश जास्त असेल. भारताच्या बहुतांश भागांत असेच वातावरण असेल. हा उन्हाळा किती जीव घेणार, हे काळच ठरवील. लोकांनी यासाठी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. उन्हात फिरणे टाळण्यासह आपण अनेक बंधने घालून घेतली पाहिजेत. ही तात्पुरती उपाययोजना करावीच लागेल.

दुसरीकडे उन्हाळा कडक व्हायला लागला की, आपण एअर कंडिशनरसारख्या आणखी भौतिक सुख देणाऱ्या सुविधा आपल्याशा करतो. महागाई कितीही असो, सुखाच्या गोष्टी घेतोच. आपल्या क्षणिक सुखासाठी आपण वातावरणाची किती हानी करीत आहोत, हे आपण उन्हाळा येताच लक्षात घेतो आणि पावसाळा आला की पावसाच्या सरीबरोबर ते लक्षात आलेले सगळे वाहून जाऊ देतो. पावसाळा आला की, झाडे लावण्याचा ऋतू येतो. मोठ्या उत्साहात वृक्षलागवड होते. मोकळ्या जागा शोधल्या जातात. झाडे लावली जातात. तो एक उत्सव बनतो. मुळात हे तापमान का वाढत आहे? याचे उत्तर आपण अनेक



वेळा ऐकतो, झाडे कमी झाली. प्रश्नच नाही, हे एक महत्त्वाचे कारण आहे. मात्र, केवळ ते कारण नाही, तर तो तापमानवाढीस आळा घालण्याचा उपाय आहे. वातावरणात फक्त वृक्ष असे आहेत की जे कार्बनडाय ऑक्साईड घेतात आणि ऑक्सिजन वातावरणात सोडतात. हा वायू पृथ्वीवर आलेले विशिष्ट तरंग लांबीचे सूर्यकिरण शोषतो. त्यामुळे पृथ्वीवरील वातावरण उबदार राहते. त्यामुळेच पृथ्वीवर जैवविविधता वाढली. तसा हा कार्बनडाय ऑक्साईड तयार झालाच नसता, त्याने सूर्यकिरणे शोषून वातावरण उबदार ठेवले नसते; तर जीवसृष्टी एवढी वाढली नसती, असे संशोधक सांगतात.

मात्र, वातावरणात कार्बनडाय ऑक्साईड वाढत चालला आहे. आम्ही तो वाढवित आहोत. त्याला शोषून संतुलन करणारी झाडे आम्ही संपवित चाललो आहोत. त्यामुळे त्याचे आणखी प्रमाण वाढत चालले आहे. या संदर्भात ग्रीन हाऊस परिणामाचीही वारंवार चर्चा होते. १५० वर्षांपूर्वी पृथ्वीवर कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण हे २८० कण प्रती दशलक्ष कण (पीपीएम) इतके होते. आज हे प्रमाण चारशे कण इतके वाढले आहे. त्यांच्या वाढत्या प्रमाणामुळे वातावरणात अनेक बदल होत आहेत. पावसाचे प्रमाण आणि नियमितता बिघडली आहे. तापमान वाढत आहे. वादळे वाढत आहेत. हे सर्व दुष्परिणाम पृथ्वीला सहन करावे लागत आहेत.

वाढत जाणारी वाहनांची संख्या, वाढते वणवे, औद्योगिक क्षेत्रातील इंधनाचा वाढता वापर हे सर्व वातावरणाला हानिकारक घटक वातावरणात सोडतात. हे प्रमाण आपण वाढविले आपल्या सुखासाठी. मात्र, त्यांना संतुलित ठेवण्याच्या उपाययोजनेचा तितक्याशा गांभीर्याने आपण विचार करीतच नाही. वाढत्या सुखासाठी वापरली जाणारी उपकरणे, त्यांना लागणारी ऊर्जानिर्मिती, ऊर्जानिर्मितीसाठी वापरले जाणारे इंधन, त्या इंधनातून बाहेर पडणारा कार्बनडाय ऑक्साईड ही साखळी येथे खंडित होते. ती पूर्ण करायची तर हा वाढता कार्बनडाय ऑक्साईड शोषणाऱ्या एकमेव घटकाचे, वृक्षांचे प्रमाण वाढविलेच पाहिजे. निसर्ग संतुलित राहिलाच पाहिजे. त्यासाठी वृक्ष लावणे ते जगविणे आवश्यक आहे. हे केले नाही तर ही सुंदर वसुंधरा आपण नष्ट करणार आहोत आणि तिचे मारेकरी असू आपण!

(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)



**कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये 'नॅनोबायो-१९' या विषयावरील ट्विटर परिषदेप्रसंगी प्रा. डॉ. पी. एस. पाटील. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. ए. डी. चौगुले, एस. बी. परीट आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

# आंतरशाखीय संशोधनास प्राथमिकता हवी : प्रा.पाटील

## न्यू कॉलेजमध्ये ट्विटर परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आंतरशाखीय संशोधन करणे ही जागतिक संशोधक समुदायासमोरची प्राथमिकता असायला हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये 'नॅनोबायो-१९' या विषयावरील चारदिवसीय ट्विटर परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. या परिषदेमुळे जगभरातील शास्त्रज्ञांनी परस्परांशी संवाद साधला. डॉ. पाटील म्हणाले, नॅनोबायोसारख्या शाखेमुळे संशोधनाची दिशा बदलली आहे. येणारे शतक हे या नवशाखेचे असणार आहे. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. ए. डी. चौगुले, एस. बी. परीट आदी उपस्थित होते.